# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

९वा मजला, न्यु. एक्सेलसियर बिल्डींग,
ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०७ ३७१९ / २८
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com


क्रमांक : बैठक-१८२२/प्र.क्र. २३७/बैठक/३१मे/२०२३/१३२५ दिनांक : 13 JUN 2023

## बैठकीचे इतिवृत्त

**मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३१/०१/२०२३, १४/०२/२०२३, २८/०२/२०२३, २८/०३/२०२३ व २७/०४/२०२३ रोजीची क्रमांक <u>६९वी बैठक बुधवार, दिनांक ३१ मे, २०२३ रोजी दुपारी १२:०० वा.</u> पुढे चालु ठेवण्यात आली असून, सदरील बैठकीचे इतिवृत्त,-

प्राधिकरणाचे सदस्य डॉ. रविंद्र शिवाजी बंगाळ, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक (दूरदृष्यप्रणालीद्वारे), श्री. रावसाहेब भागडे, (भा.प्र.से.), सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे (दूरदृष्यप्रणालीद्वारे) व श्री. महेन्द्र ब. वारभुवन (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य हे बैठकीस उपस्थित होते.

तसेच प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. विलास जी. गायकर, माजी कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड, २) प्रा.डॉ. दिलीप गोविंदराव म्हैसेकर, माजी कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, ३) डॉ. वि.म. मोहितकर, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई व ४) डॉ. शैलेंद्र देवळाणकर, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा.यांनी बैठकीच्या अनुपस्थितीबाबत नियमाप्रमाणे रजेचा अर्ज दिलेला नाही. सबब मा. सदस्य यांना अनुपस्थित घोषित करण्यात आले.

डॉ. सुनिल लिलानी, विशेष कार्य अधिकारी, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, डॉ. मुंगल एस.यु., विशेष कार्य अधिकारी, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, वैद्य जातवेद ज. पवार, प्रतिनिधी, आयुष संचालनालय, मुंबई, डॉ. गोविंद रे. संगवई, प्र. उपसंचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई व श्री. प्रकाश बच्छाव, सह-संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे (दूरदृष्यप्रणालीद्वारे) हे बैठकीस उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

विषय क्रमांक १: शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील खालील नमूद विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्राप्त झालेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावांवर निर्णय घेणे.

| अ. क्र. | बैठक वेळापत्रक | | विभाग | अभ्यासक्रम |
|---|---|---|---|---|
| | दिनांक | वेळ | | |
| १. | ३१/०५/२०२३ | दुपारी १२:०० वा. | वैद्यकीय शिक्षण | PGO, PGP, MASLP, MSPO व M.Sc. Nursing, B.P.Th., B.Sc. Nursing, BASLP, BOTh., BPO |
| | | दुपारी ०१:०० वा. | आयुष शिक्षण | BAMS, BHMS व BUMS |
| | | दुपारी ०२:३० वा. | तंत्र शिक्षण | B-Engieneering/B-Tech., B-Archtiecture, B-HMCT, M-Engineering/M-Tech., MBA/MMS, MCA, M-Architecture, DSE (Direct Second Year Engineering), DSP (Direct Second Year Pharmacy) व B - Design, B. Pharmacy, Pharm D, M. Pharmacy व Pharm D (PB) |
| | | सांय ०४:३० वा. | उच्च् शिक्षण | LLB-३, LLB-५ (Integrated), M.Ed., M.P.Ed., B.Ed., B.Ed./M.Ed. (Integrated), B.P.Ed. व BA/BSc - B.Ed.(Integrated) |

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी १) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, २) संचालक, आयुष शिक्षण विभाग, मुंबई, ३) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई व ४) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या अखत्यारितीतील सादर केलेल्या संबंधित महाविद्यालय/अभ्यासक्रम निहाय अहवालांचे अवलोकन करण्यात आले व तद्नुषंगाने निर्देश देण्यात आले,-

१) महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम १६ नुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्रवेश नियामक प्राधिकरणाचे "प्रक्रिया शुल्क" सादर करण्याबाबत प्राधिकरणाच्या दिनांक २१/१२/२०२२ व ३०/०१/२०२३ रोजीच्या परिपत्रकानुसार सर्व संबंधितांना कळविण्यात आलेले आहे,

२) शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रमांक संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१५/तांशि-४, दिनांक २२/०१/२०२० रोजी च्या पत्रान्वये "तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय / शासकीय अनुदानित / अशासकीय अनुदानित अल्पसंख्याक संस्थामधील शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० व त्या पुढील प्रवेशांची पडताळणी आणि प्रवेश मान्यता प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून देण्यात येऊ नये" असे कळविले आहे. सबब याबाबत नोंद घेण्यात आली.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

३) शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रमांक एमईडी-१०२०/प्र.क्र.२०/२०/शिक्षण-२, दिनांक २७/०१/२०२० रोजीच्या पत्रान्वये शासकीय आरोग्य विज्ञानाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयातील प्रवेशांकरिता शैक्षणिक वर्ष २०१९-२० व त्यापुढील प्रवेशाची पडताळणी आणि प्रवेश मान्यता प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून घेण्याची आवश्यकता राहणार नाही तसेच क्रमांक एमईडी-१०२०/प्र.क्र.२०/२०/शि-२, दिनांक ९/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षापासून महानगरपालिकांच्या महाविद्यालयातील आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांच्या प्रवेशांना मान्यता देण्याचे अधिकार देखील वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयास प्रदान करण्यात येत आहेत, असे कळविले आहे. त्या अनुषंगाने प्राधिकरण असा निर्णय घेत आहे की, सद्यस्थितीमध्ये **फक्त शासकीय** (राज्य शासनाची) व महानगरपालिका अखत्यारितीतील महाविद्यालये वगळून इतर सर्व महाविद्यालये/संस्थांना प्राधिकरणाच्या दिनांक २५/११/२०२२ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. ४(क) नुसार " प्रक्रिया शुल्क " अदा करणे अनुज्ञेय राहील व तसेच प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

४) शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी मागील वर्षाप्रमाणे ०१ टक्के प्रवेश मान्यता प्रस्तावांची निवडक पध्दतीने प्रत्यक्ष छानणी व पडताळणी करण्याबाबत प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०१/२०२३ रोजीच्या कार्यालयीन आदेशानुसार उपसमिती गठित करण्यात आलेली आहे. त्यानुसार तंत्र शिक्षण व उच्च शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी कार्यवाही झालेली असून सदरील उपसमितीने सादर केलेल्या दिनांक २५/०५/२०२३ व ३०/०५/२०२३ रोजीच्या अहवालाची नोंद घेण्यात आली. तसेच या अनुषंगाने १) श्री. महेन्द्र ब. वारभुवन (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई २) श्री. तुषार यशवंत शिंदे, कक्ष अधिकारी, प्रवेश नियामक प्राधिकरण, ३) श्री. आर.एल. लोंढे, परिक्षा समन्वयक, तंत्र शिक्षण विभाग, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई, ४) डॉ. जी.टी. केदार, परिक्षा समन्वयक, उच्च शिक्षण विभाग, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई व ५) श्री. जे.एम. पाटील, परीक्षा समन्वयक, उच्च शिक्षण विभाग, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या उल्लेखनीय कामाची प्राधिकरण नोंद घेत आहे.

उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे सदरील अहवालानुसार अनुपस्थित असलेल्या महाविद्यालयांना पुनश्च संधी देण्यात यावी व त्यानुसार तपासणी/छाननी प्रक्रिया पूर्ण करुन त्यांचा स्वतंत्र अहवाल प्राधिकरणाच्या पुढील बैठकीमध्ये सादर करावा, संबंधित महाविद्यालयांतील प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येणार नाही, असे ठरविण्यात आले. तसेच उर्वरित अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी संबंधित उपसमितीने अहवालाप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

५) संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे प्रवेश पडताळणी अहवाल संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या स्वाक्षरीने निर्गमित झाले नसल्याचे निर्दशनास आले आहे. संचालकांच्या वतीने इतर अधिकाऱ्यास अहवाल स्वाक्षरी करण्याबाबत अधिकार असल्याचे अथवा संचालकांनी स्वाक्षरीसाठी प्रदान करण्यात आलेले अधिकार नियमानुसार असल्याबाबतचा संचालनालयाने उचित खुलासा त्वरीत प्राधिकरणास सादर करावा, तद्नंतर संबंधित महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी प्राधिकरणाचा निर्णय घेण्यात येईल, असे ठरविण्यात आले.

६) आयुष संचालनालय, मुंबई यांच्या अंतर्गत अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयाचे प्रवेश पडताळणी अहवालांचे अवलोकन करण्यात आले असता, सदरील अहवालामध्ये अनेक चूका/दुरुस्ती असल्याचे आढळुन आले, तसेच त्रुटींचे निराकरण झाले किंवा कसे याबाबत स्पष्टता दिसून येत नाही. तसेच पडताळणी अहवाल

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

संचालक, आयुष संचालनालय, मुंबई यांच्या स्वाक्षरीने निर्गमित झाले नसल्याचे निर्दशनास आले आहे. संचालकांनी वतीने इतर अधिकाऱ्यास अहवाल स्वाक्षरी करण्याबाबत अधिकार नियमानुसार असल्याबाबतचा संचालनालयाने उचित खुलासा त्वरीत प्राधिकरणास सादर करावा, तद्नंतर संबंधित महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी प्राधिकरणाचा निर्णय घेण्यात येईल, असे ठरविण्यात आले. प्रस्तूत प्रकरणी उक्त नमूद सर्व बाबी विचारात घेता संचालक, आयुष संचालनालय, मुंबई यांनी पुनश्च प्रवेश पडताळणी करुन अहवाल सादर करण्याबाबतचे निर्देश देण्यात आले.

७) अधिनियम २०१५ मधील तरतदूींच्या अनुषंगाने संचालकांनी सादर केलेल्या अहवालानुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर तंत्र शिक्षण व उच्च शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी सादर केलेल्या तपासणी/पडताळणी अहवालानुसार ज्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी त्रुटी नाहीत, १% प्राधिकरण स्तरावरील उपसमितीच्या पडताळणी अहवालानुसार त्रुटी नाहीत तसेच प्राधिकरणाने विहित कलेल्या "प्रक्रिया शुल्काचा" भरणा केलेला आहे. अशा महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना प्रवेश नियामक प्राधिकरणाची मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला, सदरील संचालनालय/अभ्यासक्रम **(प्रपत्र-अ/महाविद्यालय-निहाय )** प्रवेश मान्य करण्यात येत आहे.

८) ज्या महाविद्यालयांमध्ये प्रवेश संख्या ० (शुन्य) आहे, अशा महाविद्यालयांना प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्क आकारणीबाबत संबंधित संचालक यांनी अभिप्राय सादर करावेत व सदर अभिप्रायाच्या अनुषंगाने सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

९) अधिनियम २०१५ च्या कलम ९(५) च्या तरतूदींनुसार प्रवेश मान्यता प्रस्ताव संचालकांचा प्रवेश पडताळणी अहवाल व प्रक्रिया शुल्कासह सादर केला आहे. संचालनालयाच्या प्रवेश पडताळणी अहवालात व प्राधिकरण स्तरावर निवडक पध्दतीने करण्यात आलेल्या १% प्रवेश पडताळणीमध्ये त्रुटी नसलेल्या प्रवेशांना मान्यता प्रदान करण्यात येत आहे. ज्या प्रवेशांमध्ये त्रुटी आढळलेल्या आहेत असे प्रवेश अमान्य करण्यात येत आहेत. या अमान्य प्रवेशा संदर्भात हितसंबंधीत घटक मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०८/२०२१ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक २(झ) मधील निर्णयांच्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या दिनांक १/१०/२०२१ रोजीच्या परिपत्रकानुसार पुनर्विलोकन याचिका विहित पध्दतीनुसार सादर करु शकतील.

१०) प्राधिकरणाच्या उक्त निर्देशानुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील ज्या महाविद्यालयातील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे (प्रपत्र-अ), अशा महाविद्यालयांना प्राधिकरणाच्या प्रवेश मान्यतेचे पत्र निर्गमित करण्याबाबत मागील वर्षाप्रमाणे (शैक्षणिक वर्ष २०२१-२२ नुसार) कार्यवाही करावी, तथापि ज्या अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी १% निवडक पध्दतीने प्राधिकरण स्तरावर तपासणी/छाननी प्रक्रिया पुर्ण झालेली नाही, अशा अभ्यासक्रमांच्या / महाविद्यालयांना संबंधीत उपसमितीद्वारे अहवाल प्राप्त झाल्यानंतर व तद्नुषंगाने प्राधिकरणाच्या अंतिम निर्णयांनतर प्रवेश मान्यता पत्रे निर्गमित करण्यात येतील.

तसेच प्राधिकरणाच्या मागील बैठकीत तंत्र शिक्षण व उच्च शिक्षण या अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी घेतलेंल्या निर्णयामधील महाविद्यालयांच्या बाबतीत १% निवडक पध्दतीने तपासणी करण्याकरिता गठित करण्यात आलेल्या उपसमितीच्या तपासणी/छाननी अहवालानुसार त्रुटीं आढळुन आलेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी प्रवेश मान्यता पत्रामध्ये ना मंजुर असल्याबाबत नमूद करण्यात यावे.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

**विषय क्रमांक २:** **<u>बॅ. नाथ पै. कॉलेज ऑफ नर्सिंग, कुडाळ, सिंधुदुर्ग यांनी दिनांक २७/०४/२०२३ व ०८/०५/२०२३ रोजींच्या पत्रान्वये कु. भारती यशवंत गोसावी यांच्या शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी नर्सिंग अभ्याक्रमाच्या प्रवेश मान्यते प्रकरणी आकरण्यात आलेल्या दंडाची रक्क्म क्षमापित करण्याबाबतच्या पत्रावर निर्णय घेणे.</u>**

बॅ. नाथ पै. कॉलेज ऑफ नर्सिंग, कुडाळ, सिंधुदुर्ग येथील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रथम वर्ष पदवी नर्सिंग अभ्यासक्रमास प्रवेशित कु. भारती यशवंत गोसावी यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी सुनावणी दरम्यान सदरील प्रवेशास रुपये १ लाख दंड आकारणी करुन मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. तथापि दंड क्षमापित करण्याबाबत महाविद्यालयाने दिनांक ८/०५/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कोविड-१९ या आजाराच्या पादुर्भावाच्या कालावधीत संस्थेच्या रुग्णालयास कोविड रुग्णालय म्हणून दिलेली मान्यता व त्यामुळे शैक्षणिक संस्थेस काही प्रकरणी आर्थिक अडचणी निर्माण झाल्या, याबाबतची वस्तूस्थिती प्राधिकरणास अवगत केली.

प्रस्तूत प्रकरणी महाविद्यालयाने सादर केलेल्या दिनांक ८/०५/२०२३ रोजीच्या पत्रास अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रथम वर्ष पदवी नर्सिंग अभ्यासक्रमास प्रवेशित कु. भारती यशवंत गोसावी यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी आकारण्यात आलेल्या दंडाची रक्कम क्षमापित करण्यात येत आहे.

**विषय क्रमांक ३:** **<u>इंटरनॅशनल इन्स्टिटयूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नोलॉजी, पुणे या संस्थेतील पदवी अभियांत्रिकी अभ्यासक्रमांना संस्थास्तरावर दिलेल्या अतिरिक्त प्रवेशाबाबत तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांचे दिनांक १९/१२/२०२२ व १६/०५/२०२३ रोजींच्या पत्रावर निर्णय घेणे.</u>**

इंटरनॅशनल इन्स्टिटयूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, (डीटीई कोड ६७५४) या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये पदवी अभियांत्रिकीमधील संगणक अभियांत्रिकी, माहिती तंत्रज्ञान व अणुविद्युत अभियांत्रिकी या अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर शिल्लक राहिलेल्या EWS/TFWS (Over & Above/Supernumerary Seats) या रिक्त जागांवर या MHT-CET सामाईक प्रवेश परीक्षांच्या गुणांच्या आधारे पात्र विद्यार्थ्यांना संस्थास्तरावर प्रवेश दिलेले आहेत. संस्थेने उपरोक्त तीन अभ्यासक्रमास एकूण ०४ विद्यार्थ्यांना प्रवेश दिलेला आहे. सदर प्रवेशांबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे,-

| अ. क्र. | विद्यार्थ्याचे नाव | प्रवेशाचा अभ्यासक्रम | पीसीएम विषयांतील एकूण गुण | सीईटी परीक्षेचे गुण | विद्यार्थ्याचा मूळ प्रवर्ग | अतिरिक्त प्रवेश दिलेला प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नेहा रोहिदास किरवे | कॉम्पुटर इंजिनीयरिंग | ८२.०० | ४४.९८ | इ.मा.व. | TFWS |
| २ | अमोल संजीव मराठे | इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी | ५१.३३ | ४४.६४ | अराखीव | EWS |
| ३ | आर्य राहुल इटकरकर | इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी | ५८.०० | ४३.३० | अराखीव | EWS |
| ४ | श्रुती रविंद्र कदम | इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन | ५२.३३ | ४४.९८ | अराखीव | EWS |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

या प्रवेशासंदर्भात संस्थेने तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना सादर केलेल्या दिनांक ११/०५/२०२३ रोजीच्या पत्रानुसार या वर्षात झालेले चार अतिरीक्त प्रवेश पुढील वर्षी द्वितीय वर्षातुन कमी करण्यात आल्यास संस्थेची हरकत असणार नाही. महाविद्यालयाची ही चुक पहिली व अंतिम समजून क्षमा मिळावी तसेच, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितास्तव नियमानुसार दंड आकारुन सदर विद्यार्थ्यांचे प्रवेश नियमित करणेबाबत संस्थेने विभागीय कार्यालयास विनंती केली आहे.

तसेच, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांनी दि.१६/०५/२०२३ रोजीचे ईमेलद्वारे प्राप्त पत्रान्वये इंटरनॅशनल ईन्स्टिटयुट ऑफ इन्फॉरमेशन टेक्नोलॉजी, पुणे या संस्थेतील पदवी अभियांत्रिकी अभ्यासक्रमास संस्थास्तरावर दिलेल्या अतिरीक्त प्रवेशाबाबत, सदर विद्यार्थ्यांनी प्रथम सत्राची परिक्षा दिली असून द्वितीय सत्राचे परिक्षा अर्ज भरण्यासाठी अडचणी निर्माण होत आहेत. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितास्तव नियमानुसार दंड आकारुन सदर विद्यार्थ्यांचे प्रवेश नियमित करणेबाबत संस्थेने केली असल्याचे संचालनालयास कळविले आहे. इंटरनॅशनल ईन्स्टिटयुट ऑफ इन्फॉरमेशन टेक्नोलॉजी, पुणे या संस्थेतील पदवी अभियांत्रिकी अभ्यासक्रमास संस्थास्तरावर दिलेल्या अतिरीक्त प्रवेशाबाबत संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे अहवाल प्राप्त करुन घेण्यासाठी दिनांक १९/०५/२०२३ रोजीचे पत्र पाठविण्यात आले आहे.

वरील वस्तूस्थिती विचारात घेता इंटरनॅशनल ईन्स्टिटयुट ऑफ इन्फॉरमेशन टेक्नोलॉजी, पुणे या संस्थेतील पदवी अभियांत्रिकी अभ्यासक्रमास संस्थास्तरावर दिलेल्या अतिरीक्त प्रवेशित १) नेहा रोहिदास किरवे यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे, तथापि शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील एकुण प्रवेश क्षमतेपैंकी ०१ जागा कमी करण्याचा व १) अमोल संजीव मराठे, २) आर्य राहुल इटकरकर व ३) श्रुती रविंद्र कदम या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे, परंतू या प्रवेश प्रकरणी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील थेट द्वितिय वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या EWS संवर्गातील एकुण ०३ जागा कमी करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.

तथापि, प्रस्तूत प्रकरणी महाविद्यालयाकडून झालेल्या गैरप्रकाराबाबत संबंधित महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील संबंधित व्यावसायिक पदवी अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या अनुक्रमे एकुण ०४ जागा कमी करण्याबाबतचा व रुपये ५ लाख दंड आकारण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला आहे. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील प्रवेश प्रक्रिया राबविताना मंजुर प्रवेश क्षमतेमध्ये जागा कमी करण्याबाबात आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या स्तरावर उचित कार्यवाही करावी. तसेच याबाबत संबंधित विद्यापीठास सुध्दा कळवावे, असे निर्देश देण्यात आले. या संदर्भात दंडाची रक्क्म संबंधित विद्यार्थी / पालक यांच्याकडून वसूल करणार नसल्याबाबत व प्राधिकरणाचा निर्णय महाविद्यालयास मान्य असल्याबाबतचे शपथपत्र महाविद्यालयास सादर करणे बंधनकारक राहील, तद्नंतर सदरील महाविद्यालयास उक्त नमूद ०४ विद्यार्थ्यांचे मान्यता निर्गमित करण्याबाबत सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी कार्यवाही करावी.

उक्त नमूद निर्णय या महाविद्यालय व या प्रकरणी लागु राहिल, विषयांकित प्रकरणी दिलेल्या मान्यतेच्या निर्णयाचा भविष्यात पुर्वोदाहरण म्हणुन वापर केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

**विषय क्रमांक ४:** **महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम १७ व १८ अन्वये प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष या दोन्ही विभागांचे लेखा परिक्षण अहवाल अवलोकनार्थ व मान्यतेकरिता सादर.**

अधिनियम २०१५ मधील कलम १७ व १८ मधील तरतूदींनुसार प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष या दोन्ही विभागांचे लेखा परिक्षण अहवाल, सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण व आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी सादर केलेले. सदरील अहवालांचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

**विषय क्रमांक ५:** **महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम १९ अन्वये प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष या दोन्ही विभागांचे वार्षिक अहवाल अवलोकनार्थ व मान्यतेकरिता सादर.**

सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण व आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी अधिनियम २०१५ मधील कलम १९ मधील तरतूदींनुसार प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष या दोन्ही विभागांचे वार्षिक अहवाल प्राधिकरणाच्या अवलोकनार्थ सादर केले. तथापि, सदरील अहवालास अनुसरुन सांगोपांग चर्चा करण्यात आली व त्यानुसार सदरील अहवालामध्ये आवश्यक बदल करण्याबाबत प्राधिकरणाद्वारे सूचविण्यात आले, त्यानुसार सुधारीत मूसदा प्राधिकरणाच्या पुढील बैठकीमध्ये सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

**विषय क्रमांक ६:** **मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.**

(क) **संत तुकाराम विधी महाविद्यालय, उदगीर या महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत.**

प्रस्तूत प्रकरणी शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), पुणे यांनी सादर केलेल्या दिनांक २९/०५/२०२३ व २९/०५/२०२३ रोजींच्या अहवालानुसार संत तुकाराम विधी महाविद्यालय, उदगीर या महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील विधी - ०३ वर्षे अभ्यासक्रमास प्रवेशित ०४ व शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील ०४ विद्यार्थ्यांना प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे (प्रपत्र-ब).

(ख) **मा. उच्च न्यायालयातील याचिका क्र. १०३३१/२०२२ मधील दिनांक २७/०९/२०२२ रोजीच्या आदेशानुसार सेट. फ्रांन्सिस ईन्स्टिटयुट ऑफ टेक्नोलॉजी, मुंबई या महाविद्यालयातील प्रवेशित कु. शेख मोह. साहिल सलीम यांच्या प्रवेश मान्यतेबाबत.**

सेट. फ्रांन्सिस ईन्स्टिटयुट ऑफ टेक्नोलॉजी, मुंबई या महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०१९-२० प्रवेशित कु. शेख मोह. साहिल सलीम यांच्या प्रवेश प्रकरणी मा. उच्च न्यायालयाच्या याचिका क्रमांक १०३३१/२०२२ मधील दिनांक २७/०९/२०२२ रोजीच्या न्यायालयीन आदेशानुसार प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

(ग) <u>शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील भाईसाहेब सावंत आयुर्वेद महाविद्यालय, सावंतवाडी, सिंधुदुर्ग व कर्मवीर व्यं. ता. रणधीर आयुर्वेद महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत.</u>

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पर्यंत ज्या महाविद्यालयांनी प्रवेश मान्यता प्रस्ताव विहित कालावधीमध्ये सादर केले नाही, अशा महाविद्यालयांच्या प्रवेश प्रकरणी संबंधितांना दिनांक १४, १५, १६, २१ व २२ फेब्रुवारी, २०२३ रोजी सुनावणी देऊन प्राधिकरणाच्या दिनांक २८/०२/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. २ मूद्दा क्रमांक १ अन्वये ज्या महाविद्यालयांनी प्रवेश मान्यता प्रस्ताव सादर केले, अशा व्यावसायिक महाविद्यालयांतील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास संचालनालयाच्या अहवालानुसार प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

तथापि, या संदर्भात उपरोक्त निर्णयातील मूद्दा क्रमांक २ अन्वये खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात आलेले आहेत,-

*"शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी ज्या महाविद्यालयांनी अद्याप "प्रवेश मान्यता प्रस्ताव" (संबंधित संचालनालयाचा प्रवेश पडताळणी अहवाल, प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रमाणित केलेली यादी व प्राधिकरणाचे विहित केलेले "प्रक्रिया शुल्क") सादर केलेला नाही व प्राधिकरणाच्या दिनांक १/०२/२०२३ रोजीच्या पत्रानुसार नियोजित बैठकीस उपस्थित राहिले नाहीत, अशा महाविद्यालयांच्या प्रवेश प्रकरणी अधिनियम २०१५ मधील कलम २०(५) नुसार प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रवेश ना मंजुर करण्याबाबत तसेच विद्यापीठाचे संलग्निकरण/मान्यता रद्द करण्याबाबत संबंधित विद्यापीठांना शिफारस करण्याबाबत सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले <u>(प्रपत्र-क)</u>."*

वरील (प्रपत्र-क) नुसार भाईसाहेब सावंत आयुर्वेद महाविद्यालय, सावंतवाडी, सिंधुदूर्ग व कर्मवीर व्य.ता. रणधीर आयुर्वेद महाविद्यालय, बोराडी, धुळे यांनी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्रवेश मान्यतेचा प्रस्ताव विहित कालावधीमध्ये सादर केलेला नव्हता, तसेच प्राधिकरणाच्या निर्देशानुसार नियोजित सुनावणीस उपस्थित राहण्यास तसेच प्रस्तूत प्रकरणी त्यांचे म्हणणे सादर करण्यास संबंधित महाविद्यालये असमर्थ ठरलेली होती. त्यामुळे सदरील महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाच्या दिनांक २८/०२/२०२३ रोजीच्या बैठकीतील विषय सूची क्रमांक २ (प्रपत्र-क) अन्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली नव्हती.

या संदर्भात संबंधित महाविद्यालयांनी शासकीय अनुदानित संवर्गातील असल्याने तसेच दिनांक १/०२/२०२३ रोजीच्या पत्रातील निर्देशांचे गैरसमजूतीतून पालन करण्यात न आल्याचे नमूद करुन भाईसाहेब सावंत आयुर्वेद महाविद्यालय, सावंतवाडी, सिंधुदूर्ग व कर्मवीर व्य.ता. रणधीर आयुर्वेद महाविद्यालय, बोराडी, धुळे यांनी अनुक्रमे दिनांक २६/०४/२०२३ व ०८/०५/२०२३ रोजीच्या पत्रान्वये दिलगीरी व्यक्त केली आहे. संबंधित महाविद्यालयांच्या शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांचा तपशील खालील प्रमाणे आहे,-

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी संख्या | संचालनालयाने प्रवेश मान्यते करिता शिफारस केलेल्या व प्राधिकरणाने मान्यता दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | भाईसाहेब सावंत आयुर्वेद महाविद्यालय, सावंतवाडी, सिंधुदूर्ग | ५० | ५० | ५० |
| २. | कर्मवीर व्य.ता. रणधीर आयुर्वेद महाविद्यालय, बोराडी, धुळे | ५० | ५० | ५० |

वरील बाबी तसेच प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेता भाईसाहेब सावंत आयुर्वेद महाविद्यालय, सावंतवाडी, सिंधुदूर्ग व कर्मवीर व्य.ता. रणधीर आयुर्वेद महाविद्यालय, बोराडी, धुळे यांना त्यांच्या कडून झालेल्या निष्काळजीपणा बाबत समज देण्यात येत असून, शैक्षणिक वर्ष २०२१ मधील उक्त तालिकेतील नमूद प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना संचालनालय, आयुष विभाग, मुंबई यांनी सादर केलेल्या अहवालानुसार प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

(घ) <u>शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये प्रथम वर्ष बी.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रम प्रवेशाबाबत संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांचेकडून प्राप्त माहितीपुस्तिकेबाबत.</u>

आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी सादर दिनांक २४/०५/२०२३ रोजीच्या प्रस्तावानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील प्रथम वर्ष बी.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रम प्रवेशाबाबत संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांचेकडून प्राप्त झालेली माहिती पुस्तिकेचे अवलोकन करण्यात आले. या माहिती पुस्तिकेतील प्रपत्र - Q मध्ये सोबतच्या प्रपत्राचा <u>(प्रपत्र-क)</u> समावेश करण्याबाबत सुचना देण्यात आल्या. सदरील माहिती पुस्तिका सीईटी कक्षा मार्फत प्राधिकरणाच्या सर्व मा. सदस्यांना अवगत करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

(ङ) <u>ॲड भारती गेरेला, विधी सहाय्यक यांचा मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे झालेल्या अतिरीक्त खर्चास मान्यता देणेबाबत.</u>

ॲड भारती गेरेला, विधी सहाय्यक यांचा मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे झालेल्या अतिरिक्त खर्चाबाबत सीईटी कक्षाद्वारे सादर केलेल्या दिनांक २५/०५/२०२३ रोजीच्या प्रस्तावास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

(च) <u>प्रवेश मान्यतेच्या विचाराधीन असलेल्या प्रवेशांबाबत संबंधीत विद्यापीठांना परिक्षा अर्ज स्विकारण्यासाठी विद्यापीठांना पाठविण्यात आलेली पत्रांबाबत.</u>

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पर्यंतच्या व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर वैद्यकीय व आयुष अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या पात्रतेसंबंधी प्राधिकरण कार्यालयाकडून निर्गमित करण्यात आलेल्या क्रमांक प्रनिप्रा/प्र.क्र.१९४/वैद्य-प्रवेश/त्रुटी पूर्तता/१०७३, दिनांक २४/०५/२०२३ रोजीच्या पत्राची नोंद घेण्यात आली.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

(छ) <u>शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पर्यंतच्या व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या पुन:श्च पडताळणी अहवालानुसार मान्यता देण्याबाबत.</u>

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पर्यंतच्या उच्च शिक्षण विभागाअंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या वेळोवेळी झालेल्या बैठकीमध्ये प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. तथापि, ज्या प्रवेश प्रकरणी उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांनी त्रुटी दर्शविली अशा प्रकरणांना प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली नाही. या संदर्भात मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २९/०७/२०२२ रोजीच्या बैठकीतील विषय सूची क्रमांक २(ड) अन्वये त्रुटी असलेल्या प्रवेश प्रकरणी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी सविस्तर अहवाल प्राधिकरणासमोर मान्यतेसाठी सादर करावा, असे निर्देश होते.

प्रस्तूत प्रकरणी प्राधिकरणाच्या उक्त निर्देशानुसार मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी ना मंजुर असलेल्या (प्रलंबित प्रकरणी) प्रवेशांबाबत त्वरीत निपटारा होण्याच्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या दिनांक १७/१०/२०२२ व १५/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पर्यंतच्या प्रवेशित ज्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशांमध्ये त्रुटी आहेत, अशा विद्यार्थ्यांची पुन:श्च प्रवेश पडताळणी/तपासणी करुन अहवाल सादर करण्याबाबत सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांशी संबंधीत संचालकांना निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार संबंधित महाविद्यालयांनी उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या तपासणी अहवालाचा महाविद्यालय निहाय गोषवारा प्राधिकरणाच्या मान्यतेकरिता सादर करण्यात आला.

सविस्तर चर्चेनंतर, उक्त बाबी विचारात घेता शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पर्यंतच्या पदवी / पदव्युत्तर व्यावसायिक उच्च शिक्षण अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरणाच्या दिनांक २९/०७/२०२२ रोजीच्या बैठकीतील निर्णयाच्या अनुषंगाने संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या विभागांतर्गत प्रवेशांबाबत सादर केलेल्या अहवालानुसार ज्या प्रवेश प्रकरणी त्रुटी नाहीत, अशा प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच ज्या प्रवेश प्रकरणी प्राधिकरण स्तरावर निर्णय घेण्याचे सुचित केलेले आहे व मा. सर्वोच्च/उच्च न्यायालयाने प्रवेशास मान्यते प्रकरणी दिलेल्या आदेशांच्या अनुषंगाने मान्यता प्रदान करण्यात येत आहे. <u>(प्रपत्र-ड)</u>

(ज) <u>राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून आयोजित सामाईक प्रवेश परीक्षांसाठी शासकीय महाविद्यालये व शासकीय संस्थामध्ये स्वतंत्र केंद्र सुरु करण्याबाबत.</u>

मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २७/०४/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ३(च) मधील निर्देशानुसार आयुक्त व समक्ष प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी SOP सादर केली व त्यावर चर्चा करुन सुधारणा प्रस्तावित करण्यात आल्या. सदरील SOP ची सुधारित प्रत पुढील बैठकीमध्ये सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

(झ) <u>महाराष्ट्र राज्य वित्तिय महामंडळ, मुंबइ यांचे मालकीची न्यु. एक्सलसिअर इमारतीतील ५व्या मजल्यावरील जागा शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या सामाईक प्रवेश परीक्ष परीक्षांच्या गोपनीय कामकाजासाठी भाडेतत्वावर उपलब्ध करुन घेणेबाबत.</u>

प्रस्तूत प्रकरणी आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी सादर केलेल्या दिनांक २६/०५/२०२३ रोजीच्या प्रस्तावास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तथापि सदरील प्रक्रिया शासनाच्या विहित पध्दतीनुसार पुर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

(ञ) **<u>शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश परिक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेबाबतचा तपशील.</u>**

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश परिक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेबाबत आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी सविस्तर माहिती प्राधिकरणास अवगत केली व तद्नुषंगाने सांगोपांग चर्चा करण्यात आली.

(ट) प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी विषयाची तातडी लक्षात घेता, बैठकीचे इतिवृत्त मंजूरीची वाट न पाहता बैठकीमध्ये झालेल्या ठरावानुसार यापुढे कार्यवाही त्वरीत करण्याबाबत निर्देश देण्यात आले. तसेच बैठकीचे इतिवृत्त निर्गमित झाल्यानंतर प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील सर्व संबंधीत विभागानी त्यांच्याशी संबंधीत प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्यामार्फत प्राधिकरणास त्वरीत सादर करावा. या संदर्भात अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण व प्रशासकीय अधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई हे दोन्ही विभागातील संबंधीत विभागांना बैठकीचे इतिवृत्त उपलब्ध करुन देतील, याबाबत कृपया नोंद घ्यावी.

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेची प्रक्रिया करण्याकरिता १) संचालनालय, तंत्र शिक्षण, मुंबई व २) संचालनालय, उच्च शिक्षण, पुणे आणि प्राधिकरण कार्यालयातील संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी परिपूर्ण माहिती/अहवाल विहित कालावधीमध्ये सादर केलेले आहेत, या त्यांच्या उल्लेखनीय कामाची प्राधिकरण नोंद घेत आहे. बैठकीच्या सरतेशेवटी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(जे.पी. डांगे) भा.प्र.से.
**अध्यक्ष,**
**प्रवेश नियामक प्राधिकरण तथा**
**माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.**

दिनांक : १२/६/२३